Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

ISSUE No- (CCCIV )304

July -2021

## Impact of Race, Caste, Class and Religion on Indian and International Society



Prof. Virag S. Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Dr Nitin A. Mathankar
Executive-Editor
Principal,
Late Vasantrao Kolhatkar
Arts College, Rohana

Dr. Deoman S. Umbarkar
Editor
Organizing Secretary
,Department of Sociology
Late Vasantrao Kolhatkar
Arts College, Rohana

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

N.S.S. PROGRAMME OFFICER
S. S. GIRLS COLLEGE, GONDIA

# जातीवाद आणि मुस्लिम मराठी कविता

डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज
मराठी विभाग प्रमुख
एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया.(महाराष्ट्र) अंसारी वार्ड, विठ्ठल नगर, गोंदिया
४४१६०१ ,parthkavita@gamil.com ,Mo.No. 9284763884

जन्माशिवाय जात नाही आणि जातीशिवाय जन्म नाही अशा व्यवस्थेत भारतीय व्यक्तिमत्व जन्माला येते ते एका विशिष्ट जातीत, समाज समूहात. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही करीता आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेकरीता मारक असलेल्या मनःस्थितीत जगत असलेला मानव कितीही सेक्यूलर म्हटल तरी स्व.जातीविषयक सुप्त भावना जोपासत असतो. भारतीय बहुसंस्कृत व जातीबद्दल समाजात जिथे परक्या जातीच्या सहभागाला मज्जाव आहे तिथे परधर्म निशिध्द म्हणून समजल्या जाणाऱ्या मुस्लिम समाजाची हिंदू राष्ट्रविषयक भावना, जातीसमूहाविषयक भावना भारतीय मुस्लिम कवीनी आपल्या काव्यलेखनात वेगळया प्रकारे व्यक्त केली आहे. धर्मनिरपेक्ष भारतातील जातीजातीविषयक भेदाभेद या कवितेत व्यक्त झालाच आहे परंतू विविध जातीमधील संस्कृतिक दरीचे सुध्दा वर्णन आहे. भारतीय समाज अठरापगड जातीत विभागला असून त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. असाच व्यवहार भारतीय मुसलमानात दिसून येतो. मुस्लिम धर्मात शिया आणि सुन्नी हे दोनच पंथ असले तरी भारतीय मुसलमान समाजही अठरापगड जातीत विभागला आहे. याचे कारण सांगताना फक्रुद्दीन बेन्नूर म्हणतात, ''मराठी मुसलमान गेल्या कित्येक शतकापासून महाराष्ट्रातच राहत आहे, किंबहूना महाराष्ट्रातील ९९% मुस्लिम हा इथल्या चातुर्वर्ण्याच्या अन्यायकारक चौकटीतून सुटण्यासाठी धर्मांतरित झालेला मुळचा मराठमोळा माणूसच आहे.''

वास्तविक पाहता मुस्लिम समाज, मुस्लिम धर्म हा हिंदू धर्मापेक्षा पूर्णतः वेगळा आहे. त्यांच्या जीवन जाणिवा वेगळया आहेत. त्याची विशिष्ट संस्कृती आहे पण महाराष्ट्रातील मराठमोळया संस्कृतीच्या विविध घटकांच्या धर्मपरीवर्तनामुळे मराठी हिंदू आणि मराठी मुस्लिम यांच्यात मिश्र संस्कृती निर्माण झाली आहे. मराठी मनूष्याच्या धर्मांतरामुळे धर्म बदलला पण त्या धर्मानुसार अर्थाजनाचे जातीसाधन बदलले नाही म्हणून मुळात शिया किंवा सुन्नी, असलेला मुस्लिम धर्म जातीजातीत परीवर्तीत झाला. हिंदू फळ विक्रेता धर्मांतरानंतर बागवान म्हणजे माळी, हिंदू खाटीक कस्साब, कापूस पिंजणारा, कापड विणणारा पिंजारी, बांगडया विकणारा अत्तार, कपडे शिवणारा शिंपी, चपला बनवणारा चांभार असे मूळ शिया व सुन्नी असलेले धर्म विविध जातीभेद जोपासणारे जातीसमूह बनले.

''जाती–उपजातींनीच–सर्व धर्म बाटलेत
वर जाणवत नाहीत आत मात्र फाटलेत (सय्यद अल्लाउद्दीन, झिंदाबाद, मुर्दाबाद पृ. ११४)

जातीउपजातीच्या विषमतेमुळे मुस्लिम धर्म जर्जर होतो आहे. आणि त्यांवर राजकारणी लोकांची वरचढ म्हणजे या जातींना प्रोत्साहन देऊन आपला हेतू साध्य करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यातच प्रांतवाद आपली भर घालतो आहे.

नका प्रांताप्रांताचे आपसात वाद भाषा भाषांचे नऊ जाजवू निनाद
चातुर्वर्णांना येथे सहारा नकोकित्येक जातीचा पसारा नको
पुन्हा ना विषमतेचे बांधावे घर (जब्बार पटेल व एकात्मता पृ. १४)

भारतीय वर्ण व्यवस्थेत विभागला गेलेला हा मुस्लिम समूह, सांप्रदायिक धर्मकल्पना आणि जातीव्यवस्थेमुळे गोंधळलेल्या अवस्थेत जगतो आहे. धर्मा भेदाच्या नावावर समाजातील भयग्रस्ततेमुळे स्वतंत्र जीवन जगता येत नाही. काही राजकारणी या जातीवादाला खतपाणी घालून अधिकच बळकट करण्याचा प्रयत्न करतात आणि विशेषत: निवडणूकीच्या काळात ही स्थिती तर निखाऱ्यासारखी धुमसत असते.

''जातीवंत मंत्र्यांसारखे, जागृत जनता
मग काय कामाची ती स्वत:च करेल सर्व सोपास्कार
जातीयवादाचे निखारे कसे धुमसत राहिले पाहिजेत(इसाही जमादार, वाटसरू पृ. ८७)

मुस्लिम समाजात प्रत्येक ठिकाणी धर्मात मान्यता नसलेला जातीवाद फोफावत असून सामान्य जनजीवन उद्ध्वस्त होत आहे. हिंदू मुस्लिम सिख ईसाई असा एकोप्याने नांदणारा धर्मभेद आज जातीभेदाच्या सिमेपार जाऊन समाजविघटन करत आहे, कधीकाळी जयभारती! जय भारती! स्वीकार माझी आरती.

तू जन्मभू, तू कर्मभू, देहात या तू मर्मभू
ही लेकरे तुझ्यावरती, आयुष्य अपूले वारती!(कलीम खान, कलीमच्या कविता पृ. ४३)
अशी आरती गणारा समाज हिंदु, मुस्लिम, सिख, ईसाई, मिळून राहू सारे भाऊ भाऊ
असानांदो शांती सदा या देशात बापु नेहरू, आझादांचा आहे हा संदेश
धर्मभेद पलिकडचा, जातीभेद विरहीत संदेश देतो

या देशात कोणताही भेदाभेद बळावू नये म्हणून समाज सुधारकांनी आपले बलिदान दिले पण जीतीवादाने त्या संदेशांना धुडकावून लाले, समाजाला मार्गदर्शन करणाऱ्या, देशाची पिढी घडवणाऱ्या शिक्षकालाही या जातीभेदातून सुटता येत नाही.'कोण आहेस तू ?

मी पीएचडी आहे, प्राध्यापक आहे, बीएड कॉलेजात
चूप! मूर्खा नाव सांग, ओळख दाखव
मी भारतीय आहे भारतवासी
चुप बे साल्या हिंदू की मुसलमान ते सांग ?(मन्सूर एजाज जोश, जेरबंद पृ. १९)

जाती–धर्म यांच्या नावावर निर्माण झालेली विषमता व्यक्तिच्या पात्रतेपेक्षा, कर्तृत्वापेक्षा जातीला महत्व देणारी असल्यामुळे शिक्षित उच्चशिक्षित वर्गही ह्या कचाटयातून सुटला नाही. आधीच परधर्मीय म्हणून परकेपणा आणि त्यात पोटजात म्हणून तिरस्कृतता सतत पदरात पडलेली असते. फक्त हिंदू धर्मीयांनी धर्मावरून तिरस्कृत केले आणि स्व:धर्मियांनी जवळ केले असे होत नाही. हिंदू धर्मातील जाती–पोटजातीसुध्दा सामान्य जीवनाच्या वाटयाला आल्यात आणि आपल्याच धर्मीयांकडून तिरस्कृतताही मिळाली. विशेषत: रोटी–बेटी व्यवहारात ही तिरस्करणीय वृत्ती मोठया प्रमाणात दिसून येते. त्यामुळे सामान्य बहूजनवर्ग भ्रमात्मक अवस्थेत जगत असतो म्हणूनच नरहर कुंरूदकर म्हणतात.''मुस्लिम समाज एक चमत्कारिक मन घेऊन जीवन जगत असतो आपल्याच मनाने निर्माण केलेल्या भ्रामक इतिहासात त्याचे मन दडलेले असून त्याचा भारताच्या इतिहासाशी फक्त मुस्लिम राजांच्या इतिहासापूरता संबंध असतो. भारतीय समाजात मिसळण्यापेक्षा आपले निराळेपण टिकवून ठेवण्याकडे त्याचा ओघ असतो. आपल्याच धर्मपरंपरेने निर्माण केलेल्या या कोंडीतून ज्यांच्या मनाची सुटका झाली आहे त्यांची परिस्थितीत याहून चमत्कारिक असते.''

'रमजानचा खुदबा आला की, लम्इलाहा इ–इलाहा आठवतो
प्रेमभंगानंतर प्रेयसी आठवल्यासारखं
बालपणीचे श्रध्देने ओथंबलेले रोजे
गहाळझालेले असतात औरंगजेबाच्या स्वप्नासारखे(फ.म. शहाजिंदे, निधर्मी पृ. २९)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 304 (CCCIV)
ISSN : 2278-9308
July 2021

मनाची अशी चमत्कारीक स्थिती होऊन प्रत्येक धार्मिक सणव्रत तेवढयाकाळात तेवढयापर्यंतच आठवतात. तेव्हा खऱ्या धर्माचे पालन न करता मुल्ला मौलवींच्या इच्छेला, फतव्यांना मान देऊन दर शुक्रवारी होणारा खुदबा पार पाडला जातो. 'खुदबा' म्हणजे दर शुक्रवारी दुपारच्या नमाजमध्ये धर्माच्या नावावर मुख्य व्यक्तीचा विशिष्ट धर्मोपदेश होय. या धर्मोपदेशकाला 'इमाम' म्हटले जाते. यावेळेस मुस्लिम धर्म जाती पोटजातीमध्ये कोणताही, भेदाभेद केला जात नाही. सर्व एका पंक्तीने बसून धार्मिक कृत्य पार पाडतात पण रोटी–बेटी व्यवहारात मात्र पोटजात, उच्च निचं भेद केला जातो.

पोरीच्या स्थळासाठी शब्द टाकल्यावर
क्या ? तुम कस्साब ...... क्या ? तुम पिजारे ....
क्या ? तुम ढोमणे ...... क्या तुम इलालखोर ......
क्या ? तुम अर्जल ......
हम इनकी लडकी नही मांगते ..... या अल्ला
आता तुझ्या नावे किती धाय मोकलून रडावे
इथली मातीच इब्लिसांची मांद(जावेद कुरैशी, बएत पृ. ४६)

धर्मकृत्याच्यावेळी कोणताही भेदाभेद न पाळणारा समाज सामाजिक, सांस्कृतिक संबधांच्या वेळी फक्त भारतीय जातीभेदामुळे परका होतो. विशिष्ट जातीवरून रोटीबेटी व्यवहारात स्पृश्य–अस्पृश्य दर्जा दिला जातो. हलालखोर, अर्जल सारखे शब्द वापरून जातीवरून हिवावले जाते. नुसते हिणवलेच जात नाही तर तिरस्कृत करून परकेपणाचा व्यवहार केला जातो. इथे इस्लाम धर्माच्या 'अल्ला एक आहे, सर्व मुस्लिम समाज एक आहे' या तत्वज्ञानाला डावलले जाते. असे डावलले जाणे फक्त भारतातच होते. कारण भारतातील ९० टक्के मुस्लिम वर्ग इथलाच धर्मांतरित दलित सदृष्य असा हिंदू वर्ग होय. हे स्पष्ट करताना फ.म. शहाजिंदे म्हणतात, ''भारतीय मुसलमान हा तसा इथून तिथून एकजिनसी मानला जात असला तरी तसा तो अजिबात, अस्तित्वात नाही. कारण भारतीय मुसलमान प्रांतोप्रांती विविध जाती स्तरांवर विखुरलेला आहे. या विखुरलेल्या भारतीय मुस्लिम समाजात विविध उच्चनिचतेच्या श्रेणी आहेत. जातीस्तर आहेत. (१) मुळचे उच्च (२) स्थिर धर्मांतरित (३) भटके धर्मांतरित (४) शहरी (५) ग्रामीण असे त्यांचे ढोबळ आणि ठळक भेद करता येतील. या संपूर्ण भारतीय मुसलमानांच्या संख्येत बहुसंख्य ग्रामीण धर्मांतरित मुसलमान आहेत.''

हीच ग्रामीण धर्मांतरित मुस्लिम जात सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय प्रवाहाबाहेर फेकली जाते. धर्म मुसलमान म्हणून वरच्या पातळीवर म्हणजे ओपन मध्ये गणला जाणारा हा वर्ग सर्व शासकीय सुख सुविधापासून वंचित असतो. महात्मा फुलेच्या

विदयेविना मती गेली! मतीविना निती गेली
नीतिविना गती गेली! गती विना वित गेले!
वित्तविना शुद्र खचले! एवढे अनर्थ एका अविदयेने केले

या ऊक्तीनुसार हा उपेक्षित वर्ग खचलेला असून मुळचे उच्च किंवा मुल्ला मौलवी या वर्गाशी त्यांचे काहीही लागेबांधे नाहीत. फक्त निवडणूक आणि धार्मिक उत्सव वा संदल यामध्ये मत वाढवणे आणि गर्दी वाढवणे या दोन कार्यक्रमाशिवाय कुठलाच दर्जा या वर्गाला प्राप्त होत नाही. सामान्य पानटपरी, पंचर सुधार, हातठेला, हमाली, रोजंदारी, झालेच तर छोटेसे होटेल, बांगडया विकणे, भाजीपाला, ट्रक, आटो चालवणे असेच व्यवसाय पदरी पडलेले असतात. हा समाज आर्थिक दारिद्रय, शैक्षणिकदृष्टया मागासलेपणा आणि राजकीय उदासीनता घेऊन जगत असतो.

कुठल्यातरी वेदनेच्या वारशाने उद्‌वस्त केले असतील, जोखडदंड ब्राम्हणी संस्कृतीचे आणि, बएत घेउन झाला असेल अल्लाहू अकबरचा वारसदार

एका क्षणी अत्यज फुत्कारून, उठला असेल
फेकून गळयातील मडके अन गांडिला बांधलेला फडा
शिरमा असेल वस्तीत सिंहासारखा हातात घेऊन कुराण''(जावेद कुरैशी, बएत पृ. २२)

मुस्लिम समाज शुद्र कसा झाला ? का झाला ? याची नोंद घेणारी ही कविता वास्तवदर्शी असून इतिहास विशद करणारी आहे. चातुर्वव्यवस्थेच्या कचाटयातून सुटण्यासाठी सरळ स्व:धर्म नाकारून परधर्मात जाण्याचा विद्रोह करणारी ही पिढी तिथेही उच्च वर्गीयांच्या प्रतारणेला सहन करते आहे. उच्चवर्गीयांच्या घरी श्रीमंती पाणी भरत असते व सामान्य मुस्लिम कुटुंब मात्र उपाशीपोटी दिवस काढतात. धर्माच्या नावावर एकत्रित येणारे आर्थिक पाठवळ मात्र कधीही देत नाही.

सोनियाचा दीप जळे महालात तेलाविण अंधारपडे झोपडीत
अन्नाचाढीग सडनि जाई अन्नाविण मुले झोपी जाई
सोनियाचा धूर निघे महालांत ओल्या काटक्यांचा धूरझोपडीत
संपे कधी हो घोर विषमता समानते विण सुख ना जगता

एकीकडे समाजघटकांच्या धरून सोन्याचा धूर निघतो, सोन्याचे दिवे उजळतात तर दुसरीकडे संपूर्ण जीवनच अंधारमय असते. अन्नांचे ढिग सडवणाऱ्या जमातीत अन्नाशिवाय लहान मुलं झोपी जातात अशी विषमता स्विकारलेल्या धर्मनिही वाटयाला आणली आहे ही एक खंत, तर धर्मातरित म्हणून नाकारले जाण्याची दूसरी वेदना यात सामान्य मुस्लिम मनुष्य भरडला जातो आहे. यामुळे फक्त आणि फक्त गरीब दरिद्री समाज पिचला जातो आहे. मुल्ला मौलवी वा उच्चवर्णीय, राजकारणी यांना त्याची कल्पनाही नसते.

''जाती धर्मातील असो देशप्रदेशातील असो
मुल्ला पंडितातील असो पक्षापक्षातील असो
मारली जातात फक्त हातावर पोट असधारीसामान्य माणसं
(मुबारक शेख, दहशतनामा पृ. ४३)

भारतीय धर्मांतरित मुस्लिमांच्या वाटयाला आलेल्या हया जीतीसंकट विषमतेमुळे धड मुस्लिम नाही आणि धड हिंदूही नाही अशा बिकट अवस्थेत हा समाज जगता आहे. याचे कारण सांगताना राजेखान शानेदिवाण म्हणतात भारतीय समाजव्यवस्थेत इसलाम रूजला. पण हे रूजणे भारतीय मानसिकतेच्या अंगाने घडले त्यामुळे भारतातील मुस्लिमांनी इस्लामचा स्वीकार सोयीनुसार केला. भारतीयांसाठी इस्लाम हा परकीय धर्म स्वाभाविकपणे स्थानिक हिंदूच्या धर्मांतराने येथील मुस्लिम समाजाने आकार घेतला. यावर हिंदूतील जातीव्यवस्थेचा प्रभाव मोठया प्रमाणात आहे. हिंदू धर्मनि जातनिहाय व्यवसायाची निश्चिती केली तीच पध्दत मुस्लिमांमध्ये राहिली. त्यामुळे धर्म बदलला पण व्यवसाय मात्र जुनाचा राहिला यामुळे अनेक समस्या निम्रण झाल्या.''

पण आज पाठीवर कुणीतरी म्हटलं
या लांडयावर टाका रे टाका रंग
पाठीमागूनझालेल्या शिव्यांना गुंडाळत
होळीच पेटवायला गेला तर तिथे
होळीलाच दिसल्या प्रल्हाद जेवलाच नाही.
तेव्हा माझीच होळी पेटली तिन राख
परतली किरायाच्या घरी!

आता खुशाल बसा स्मशानात माझ्या
संशोधन करीत मी मुस्लिम असल्यानसल्याच'(फ.म. शहाजिंदे, निधर्मी पृ. १९)

धर्माची कोंडी फोडून जगायचा प्रयत्न करणाऱ्या मुस्लिम मनुष्याच्या मनाला तीव्रपणे जाणवते की तो आपल्या समाजापासून तुटलेला आहे नी उरलेल्या समाजाशी जुळलेला नाही. वर्षानुवर्षे या मातीत मिसळल्यावर मराठी, संस्कृतीशी, एकरूप झालेला समाज स्वातंत्र्यानंतर, फाळणीनंतर अगदी परका वाटायला लागला. व्रत, सण पार पाडत असताना धर्मांतरित मुसलमान असल्याची जाणिव मुस्लिम समाज करून देतो तर हिंदू व्रत वैकल्याच्या काळात मुस्लिम असल्याची जाणिव हिंदू करून देतात. यातही महत्वाचं म्हणजे जे धर्मांतरित नाहीत ते आपल्या हिंदू बांधवांशी मिळूनमिसळून व्यवहार करतात आणि सामान्य वर्गाला मात्र त्रास सहन करावा लागतो. हदिसपुराण एकमेकांना एकूनऐकवून, ईदमिलनाचा, कार्यक्रम करून आणि हिरव्या झेंड्यांला भगवा झेंडा बांधून सर्वधर्मसमभाव पाळून स्वत:ला सुरक्षित ठेवणे आणि तळागाळातल्यांना जातीधर्माची बेडी अडकवून देणे अशा आपमतलबी मानसिकतेमुळे बहूजन समाजाची कोंडी होते. जे सामाजिक स्तरावर होते तेच राजकारणातही सुरू आहे.

ते पुजारी संत बाबा थाटली त्यांनी दुकाने
अंधश्रध्देची विषारी हे बिचारे भांग प्याले,
छावणी सोडून आता शोधण्या चारा नवा हे राजधानीला निघाले
(कलीम खान, कलीमच्या कविता पृ. १५)

अशा संताची, पुजाऱ्यांची मुल्लामौलवींची समाजात अंधश्रध्दा पसरवून सामान्य बहूजन समूहाला अज्ञानात ठेवून स्वत:चा सत्तास्वार्थ, संपत्तीस्वार्थ पूर्ण करता येतो. राजकारणात सक्रिय असलेल्या मुस्लिम धर्मीय उच्चभ्रूंना समाजाबद्दल कीव नसते आणि मुल्लामौलवींना समाज नवप्रवाहात यावा असे वाटत नसते. दोन्हीकडून होणारी दिशाभूलीमुळे समाज अधिकाधिक गर्तेत जातो. बहूजनसमाजाला धर्मांध बनवून विनाशाकडे नेणारे हे मनसुबे मानवता नष्ट करणारे असतात. म्हणूनच धर्मभीरू जनतेने मुल्ला मौलवीकडे श्रध्देने, निरागस दृष्टीने न पाहता त्यांच्याशी डोळसपणे व्यवहार केला पाहिजे.

मौलवी अजाज आणि ताळेबंदईदच्या दिवशी कडकडून मिठी मारून
सदिच्छा देणाऱ्यांची तपासली मने
तर आपल्या अस्त्विनाराशाच्या येतात हाती योजना
म्हणून आजकल मी केलीत बंद परियाची कवाडे
दिले थोडे कावेबाज होण्याचे धडे(अजीम नवाज राही, व्यवहाराचा काळा घोडा पृ. २९)

धर्माच्या नावावर मानवी जीवनात प्रकाश तर पडतच नाही उलट मानवतावादाला नष्ट करणाऱ्या विविध घटना घडून श्रध्देला आरपार तडा जात असला तरीही एखादाच सुजाण व्यक्ति या बाबींना नकार देतो तेव्हा त्या नकार देणाऱ्याची मुस्कटदाबी केली जाते. समाजाच्या जीवनावर पडलेली अंधश्रध्दारूपी जातीवादी खपली तर सुटली तर सामान्य वर्ग जागृत होईल आणि आपली जागा धोक्यात येइल ही भीती या उच्चभ्रू वर्गाला आहे. त्यामुळे कोणीही जातीयवादामुळे रुजणाऱ्या अंधश्रध्देचे पाळेमुळे खणून तिला मुळासकट नष्ट करत नाहीत.समाज जात धर्म अशी कोणतीही बंधने न पाळता आपण फक्त भारतवासी आहोत, फक्त मानवताधर्म हाच आपला धर्म आहे अशी भूमिका कोणीही तयार करत नाही. मग प्रत्येक वेळेस मी कोण ? हा प्रश्न पडून त्या मनाला वेगवेगळे कंगोरे निर्माण होतात.

मी कोण ? मी भेसूर विसंगती
मी कोण ? मी एक पडका शेवाठलेला

खंडहर की शापित भिंत ?
मी कोण ? मी शिया, मी सुन्नी, मी हिंदू, मी अहिंदू
पाक—नापाक, पवित्र—अपवित्र हिंद—सिंध कोण ?
(जुल्फी शेख, मी कोण ? पृ. १६—१७ ०१८९)

सामाजिक, धार्मिक, जातीय ताणतणावाच्या वेदनेने ग्रासलेल्या समूहमनाची वेदना व्यक्त करणारी ही कविता स्व:अस्तित्वाच्या शोधात भटकत असते. नेमका कोणाला प्रश्न विचारावा ती दिशाच सापडत नाही त्यामुळे संभ्रमावस्था निर्माण होऊन गोंधळलेला समाज अधिकच गोंधळात पडतो. म्हणूनच तुल्फी शेख म्हणतात, आज आपल्याच देशात केव्हातरी वरिष्ठवर्णीयांच्या छळाला त्रासून धर्मपरिवर्तन करणारा अज्ञानी भोळा समाज आपल्याच मायभूमीत सुरक्षित नाही. बाहेरचे म्हणून, पाकिस्तान धर्जिणे म्हणून असंख्य शिव्यांच्या, शंकांच्या जाळ्यात अडकलेल्या या समाजाला सुजाण धीरगंभीर नेतृत्वाची गरज आहे.'' पण असे नेतृत्व तर मिळत नाहीत उलट संवेदनाहीन समाजात अनेक गोष्टीवरून भांडण होऊ लागले.

एक दिवस त्या मुळया आपआपसात भांडू लागला
माझा जन्म आधी की तुझा ?
मी मोठा की तू मोठा ? मी उजवी की तू डावी
हा मुद्दा मांडू लागल्या.
मग खोडाकडे आणि खोडाकडून झाडाकडे
पाणी जायचे बंद झाले भांडणात खोड वाळून गेले
खजुराचेझाडच बारिक सारीक झाले.(सय्यद अल्लाउद्दीन, झिंदाबाद—मुर्दाबाद पृ. ३७)

मानवाचा जातीवादी कलह मनुष्यासोबतच समाजालाही पोखरण्याचे कार्य करते. या जातीवादामुळे, धर्मवादामुळे भाषेवरही परिणाम होतात. महाराष्ट्रातील मुस्लिम मराठी बोलला की त्याला,'अबे क्या म्हराटी बात करताय बम्मन के छोकरे जैसी' असे रडावून विचारले जाते किंवा मुसलमान असूनही मराठी छान बोलतो' असे बोल लावले जातात. मराठी मुस्लिम समाजाकरीता मराठी ही अजाण नाहीच ती त्यांची धर्मांतरापूर्वीची मातृभाषाच आहे त्यामुळे आपल्या प्रांतातील भाषेत पारंगत असणे हा हक्क नव्हे कर्तव्यच आहे ही भावना व्यक्त होते.

नव्हते अजाण येथे नवख्या प्रदेशी या त्या
प्रदेश होता माझा वाणी माझीच होती
जाणून नाकारलेला भाषाभेद होता ......
अस्सल मराठी मी हे उलट माझेच होते
होते कशी मराठी आहे कशी मराठी सारेच माझे सारे
सारेच माझे साथे, साथे साथेच होते सारे साथेच सारे(जुल्फी शेख, मी कोण ? पृ. ७७)

मुस्लिम समाजजीवन कुराणाने व्यापले असले तरी मूळ हिंदू संस्कृतीतील सगळे संस्कार आत्मसात करून, भाषा आत्मसात करून तिच आपली मातृभाषा आहे. या भाषेची गोडवी ही सतत राहील. मराठी संस्कृतीचा स्पर्श असलेल्या मुस्लिम समाजात भाषेसोबतच इतर रूढी, परंपरा, सण व्रत वैकल्य यांनाही जीवनात स्थान आहे.म्हणूनच

महाराष्ट्राचे बहूजन समाजालापुजावे लागते कुल दैवताला
काळूबाई खंडोबा म्हसोबालाबकरे कापण्याचा अधिकार मुसलमानाला
बकरे कापताना नांव काय घेतीला
बोलणार नाही काळूबाई खंडोबा — म्हसोबाला
बिसमील्लाह—अल्लाह अकबर म्हणैनि

सुरा फिरवला हिंदूचा देव जागृत झाला.(बादशहा सैय्यद सुचल्या पृ. ३८)

अशा हिंदू–मुस्लिम जातीभेद, धर्मभेदासोबतच समाजातील त्यांचे परस्परसंबध अपवाद म्हणून व्यक्त होतात. भारतीय सामाजिक व्यवस्थेतील चातुर्वर्ण्य विभागणी ही फक्त हिंदू धर्मातच नव्हे तर मुस्लिम धर्मातही जातीवाद निर्माण करून सामाजिक समस्या निर्माण करते असा आशय अनेक कवितांमधून व्यक्त होतो.

समारोप :–

एकंदरीत मुस्लिम मराठी कवितेतील जातीवादाचे चित्रण जातीद्वेषाच्या किंवा जातीभेदाच्या विकृत रूपाचे उल्लेख करत नाही तर मूळ धर्मात नसलेल्या जातींमुळे बहुजन समाजाची दयनीय अवस्था कशी दिवसेंदिवस विकोपाला जात आहे याचे दर्शन घडविणारी आहे. या जातीमुळे स्व:धर्मातील, स्व:समाजातील सामाजिक विषमता आणि त्या विषमतेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक समस्या यांचा आढावा घेत यामुळे बहुजन मुस्लिम समाजात आपल्याच जीवनाबद्दल नैराश्यात्मक वातावरण निर्माण झाले याचे चित्रण ही कविता करते. कुठलाही जातीवाद, जातीप्रेम, अंधश्रध्दा, परंपरा धार्मिकता यांचा पुरस्कार न करता जातीविरहीत समाज निर्माण होऊन स्वत:चा स्वसमाजाचा अधिकाधिक विकास व्हावा हा आशावाद ही कविता व्यक्त करते. म्हणूनच डोळे त्यांना दृष्टी दे, वाणी त्यांना विवेक दे, दिलीस तर एक सतत प्रक्रियेची आस दे, अशी मागणी इश्वराजळ करून सतत परिवर्तन झाले पाहिजे जेणे करून मुस्लिम बहूजन समाज मागास पारंपारीकता सोडून नवप्रवाहात सहभागी होईल. अलिफ बे, मनसल्वा, बुरखा या पारंपारिक बाबींना आता अतीमहत्व न देता नवशिक्षणाचा प्रचार–प्रसार या समाजात होऊन नवनेतृत्व निर्माण व्हावं अशी मुस्लिम मराठी कविता जातीवादाच्या अंगाने अपेक्षा व्यक्त करते.

संदर्भ :

१)फकरूद्दीन बेन्नूर, मन्हारवाणी विशेषांक, १९९५.
२)सय्यद अल्लाउद्दीन, झिंदाबाद मुर्दाबाद, दिलजान प्रकाशन, आष्टी.
३)सय्यद जब्बार पटेल, एकात्मता, शब्दांगार प्रकाशन, हिंगोली १९९४.
४)इलाही जमादार, वाटसरू, अनिता प्रकाशन, मलकापूर २००४.
५)मन्सूर एजाज़ जोश, जेरबंद, अनु. लोकनाथ यशवंत, आंबेडकरी साहित्य प्रबोधिनी,चंद्रपूर २००३.
६)फ.म.शहाजिदे, निधर्मी, आंतरभारती प्रकाशन, औशद शहाजनी १९७९–८०.
७)जावेद कुरैशी, बएत, युगसंवाद प्रकाशन, नागपूर १९९७.
८)मुबारक शेख, दहशतनामा, विजय प्रकाशन, नागपूर २०११.
९)कलीम खान, कलीमच्या कविता, प्रगत प्रकाशन, आर्णी यवतमाळ, २००४.
१०)अजीम नवाज राही, व्यवहाराचा काळा घोडा, मुक्तछंद प्रकाशन, नागपूर.
११)जुल्फी शेख, मी कोण ?, युगसंवाद प्रकाशन, नागपूर २००१.
१२)बादशहा सय्यद, सुचल्या, नवजीवन प्रिंटींग प्रेस, पुणे.

Impact Factor-7.675 (SJIF)
ISSN-2278-9308
December-2021
ISSUE No- (CCCXXXIII) 333

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

# वैदर्भीय साहित्यधारा

## शोधनिबंध विशेषांक

२०२१

- संपादक -

डॉ. अजय चिकाटे

डॉ. विजय राऊत

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 333 (CCCXXXIII)
ISSN : 2278-9308
December, 2021

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | मुक्तिबोधांची दीर्घ कविता — डॉ.कोमल वि. ठाकरे | 1 |
| 2 | वैदर्भीय प्रजाप्रिय प्रथम राज्यकर्ती–नागनिका — डॉ.गणेश चव्हाण | 8 |
| 3 | राष्ट्रसंताच्या पोवाडयातील ग्रामोध्दाराची सुत्रे — डॉ. प्रवीण कारंजकर | 11 |
| 4 | रवींद्र शोभणे यांच्या दोन कादंबऱ्या — प्रा.डॉ.अनिल बोपचे | 16 |
| 5 | वैदर्भीय कथाकार: सदानंद देशमुख — डॉ.प्रवीण घारपुरे | 20 |
| 6 | ग्रामीण कादंबरी: स्वरूप आणि आशय — डॉ. सुधीर बब्रुवान मोरे | 24 |
| 7 | यशवंत मनोहर यांच्या जीवनायन आणि वामन निंबाळकर यांच्या महायुध्द या काव्यसंग्रहातील आशयाचे वेगळेपण — प्रा. डॉ. प्रशांत रामदासजी राऊत | 28 |
| 8 | कुसुमावती देशपांडे यांचे ललित निबंध लेखन — डॉ. मंगला डाहाट | 33 |
| 9 | वैदर्भीय स्त्रीचे नेतृत्वकरणारी 'धग' कादंबरीतील कौतिक — प्रा. सतीश एस.कर्णासे | 38 |
| 10 | झाडीपट्टीतील 'बहिणाबाई' : कवयित्री अंजनाबाई खुणे — डॉ.पद्माकर डिगांबर वानखडे | 42 |
| 11 | 'आकांत' कारबाबाराव मडावी - एक परिवर्तनवादी आदिवासी साहित्यिक — श्री सूर्यभान डोंगरे | 47 |
| 12 | आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री चळवळीचे स्वरुप — डॉ. स्मिता प्र. खोंडे | 52 |
| 13 | झाडीपट्टी नाटयशारदेच्या दरबारातील प्रथितयश कलावंतांची मांदियाळी — डॉ धनराज एल खानोरकर | 57 |
| 14 | राघववेळ : एक आकलन — डॉ. नरेंद्र इश्वर घरत | 62 |
| 15 | निखाऱ्यांच्या पाऊस पाडणारा वैदर्भीय कवी : जावेद पाशा — डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज | 67 |
| 16 | वैदर्भीय कविता आणि कवी — प्रा. भोजराज व्ही. बोदेले | 73 |
| 17 | सटवाई : ग्रामीण व्यवस्थेचे धगधगते वास्तव उलगडणारा कथासंग्रह — डॉ. कैलास वानखडे | 76 |
| 18 | झाडीपट्टीतील दंडार लोकनाट्य – स्वरूप आणि चिकित्सा — डॉ. शरद जे. मेश्राम | 83 |
| 19 | गिरीश सपाटे यांची कविता : मर्मबंध ते काळोख गडद होत चाललाय... — डॉ.अशोक भक्ते | 87 |

ISSN : 2278-9308
December, 2021

# निखाऱ्यांच्या पाऊस पाडणारा वैदर्भीय कवी : जावेद पाशा

डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज
मराठी विभाग प्रमुख एस.एस.गर्ल्स कॉलेज,गोंदिया. (महाराष्ट्र) अंसारी वार्ड,
विठ्ठल नगर, गोंदिया ४४१६०१

डॉ. यशवंत मनोहर यांनी शुभेच्छा देतानाच 'हे गांधी कशातच राम नाही' हा कवितासंग्रह म्हणजे निखाऱ्यांचा पाऊस आहे. राजकारणापासून धर्म, अर्थ, संस्कृती अशा सर्वच क्षेत्रामधील अमानुषतेवर कवीने इल्लाबोल केला आहे असे मत व्यक्त केले आहे. संपूर्ण काव्यसंग्रह वाचताना हा अभिप्राय कीती चपखल आहे हे लक्षात येते.

प्रस्तावना :–

कवी जावेद कुरैशी उर्फ जावेद पाशा यांचा जन्म गडचिरोली जिल्हयात २५ जून १९६३ ला सामान्य कुटुंबात झाला. त्यांनी समाजशास्त्र, अर्थशास्त्र, पदव्यूत्तर शिक्षण प्राप्त करून एम.एड., एम.फील या पदविका घेतल्या आहेत. नागपूर इथे वास्तव्य असणाऱ्या या कवीने 'बएत', 'मुहाजिर' आणि 'हे गांधी कशातच राम नाही' हे काव्यसंग्रह लिहिले आहेत. मुस्लिम साहित्य चळवळीत, सम्जच चळवळीत अत्यंत पोडतिकीने सर्वस्व अर्पण करून धडाडीचे असे कार्यकर्ते म्हणजे जावेद पाशा होत. त्यांच्या कर्तुत्वाचा सामाजिक आलेख एवढा मोठा आहे की शब्दात त्याचे वर्णन करणे कठीण. मुस्लिम जातीच्या विशिष्ट दलितसदृष्य उपजातीत जन्माला आल्यामुळे त्यांच्या वाटयाला उपेक्षा अवहेलना झाली. स्व.समाज आणि उपच्भ्रू, मुस्लिम समाज यांच्यातील तफावती, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय कोंडीत सापडलेल्या समाजाचे ते एक घटक होते. या कोडीला वाचा पहिला काव्यसंग्रह 'बएत' (१९९७), 'मुहाजिर' (२००३) 'हे गांधी कशातच राम नाही' (२०१०) हे या काव्यसंग्रहांनी फोडलेली आहे. याशिवाय जावेद पाशा यांचे भारतीय समाज, मुस्लिम समाज, भारतीय संविधान, तत्कालीन राजकारण आणि राजकारणी यावर प्रकाश टाकणारे अनेक लेख प्रकाशित झालेले आहेत. विविध विषयावारच्या पुस्तिकाही वाचनीय आहेत.

हे गांधी कशातच राम नाही: १७ जून २०१० ला भूमी प्रकाशन लातूर ने प्रकाशित केलेला हा काव्यसंग्रह एका अस्वस्थ भारतीय मराठी व्यक्तिच्या कोंडलेल्या श्वासाचा चित्कार आहे. डॉ. यशंवत मनोहर, डॉ.प्रमोद मुनघाटे, जैमिनी कडू यांचे शुभेच्छापर अभिप्राय कवीचे मनोगत आणि प्रा. फ.म.शहाजिंदे यांची प्रस्तांवना या काव्यसंग्रहाला लाभलेली आहे. काव्यसंग्रहाच्या शिर्षकावरून कवीने महात्मा गांधींशी संवाद साधल्याचा भास होतो. गांधीतत्व, गांधीवाद पटलेल्या बुध्दाचे शिक्षा पात्र होऊ पाहणाऱ्या येशू ख्रिस्ताची वेदना जाणवणाऱ्या, गुरूनानक, मुहंमद पैगंबरासारखी कुर्बानीची इच्छा ठेवणाऱ्या, मिरा–सावित्रीचा भक्तीभाव जोपासणाऱ्या, साक्रेटीसच्या जवळ जाउ पाहणाऱ्या आणि गॅलिलिओच्या सत्याची गर्जना देणाऱ्या अशा अनेक स्वप्नांचा, आकांक्षाचा अविष्कार या काव्यसंग्रहात झालेला आहे. बाबासाहेबांच्या चवदार तळयाचे कर्तृत्व, फुल्यांचे अनाथ माहेर, संतांची भक्ती श्रध्दा या संर्वावर आज फासलेल्या पंरपरांचा शेदूर चढला आहेत. त्या शेंदराच्या खपल्या काढण्याचा व उपरोक्त विभूंतीच्या कर्तृत्वाला पुन्हा उजाळा देण्याचा कवीचा मानस आहे. हे होत नाही, करता येत नाही म्हणून,

मी एवढा अस्वस्थ कधीही नव्हतो
होती अनवानी पायांची वाट
पण एवढा बेचैन कधीही नव्हतो....
सुंगधात येतोय हा दर्प कसला

सुखाच्या घरात या का श्वास कोंडलेला
चार भितींच्या आत कोण बंदिस्त कैदी
बाहेत चित्कार कुणाचा ओथंबलेला......

स्वतंत्र देशाच्या स्वतंत्र संविधानाच्या छत्रछायेत मुक्त जगणे वाटयाला न येता. कमल... दर्प आणि रक्ताचा रंगच का दिसतो. गांधी, आंबेडकराच्या या देशात असे रक्त कसे गोठते हा प्र... पडल्यावर कवी प्रत्यक्ष गांधींनाच मागच्या साठ वर्षाच्या राजकीय कालखंडाचा आढावा घेत त्या... मृत्यप्रसंगी उद्गारलेल्या 'हे राम' ला आता अर्थ राहिला नाही असे सांगतात.

हे गांधी तुझ्या कुर्बानीने भारताच्या निर्माणाआधी
धर्माधिदेशाची दुसरी स्थापना थोपवून धरली, पण,
अंतीम श्वास घेताना, तुझ्या 'हे राम' मधील राम ला
अडवाणीच्या 'स्थयात्रेनंतर', नरेंद्र मोदीने
गुजरातेत संपन्न केलेल्या 'संहारक प्रयोगानंरत .....
'बाबरी' च्या विध्वसानंतर....
मालेगांवच्या स्फोटात पकडल्या गेलेल्या प्रज्ञा साध्वी नंतर
करकरे, कामटे आणि इतरांच्या 'शाहिदी' नंतर....
जेव्हा संघप्रणित महिंदूत्वाला तू पूर्णपणे ओळखलंस
आणि म्हणालस 'मुझे और मूर्ख नही बनाया जा सकता ....!'
तेव्हाच यांना खरी अडचण वाटली
आणि नत्थुरामाने गोळी झाडल्यावर तू जे शेवटचे
'हे राम' म्हटले तेव्हा तुझा आर्त स्वर,
'रामा आता तुझ्या नावे
हा दहशंतवाद कोण रोखणार असाच होता!' (पृ. १९, २०, २१)

आडवांनींची रथयात्रा, गोधराकांड, बाबरी मस्जिद, नांदेडमधील बाम्बस्फोट, ग्रहम स्टे... हत्या, कर्नाटकातील दंगली, मालेगावचा स्फोट, ताज हॉटेल चे बलिदान, निरागस, निरपराध कैदया... आत्महत्या, अजमेर समझौता एक्सप्रेसचा बॉम्ब्स्फोट, असिमानंदाचा कबुलीजबाब हया घटना निर्वि... देशात घडल्या पुढे घडतिलही. गांधीना या घटनांची पूर्वकल्पना होती म्हणून मूर्ख बनवू नका अ... त्यांनी स्पष्ट म्हटले व त्यांचीच अडचण होईल म्हणून राष्ट्रपित्याची हत्या करण्यात आली. ... महात्म्याने जाताना 'हे राम' म्हटले म्हणजे ईश्वराजवळ अशा घटनांची तक्रार करून या घट... आळा घालण्या करीता करूण आर्त हाक मारली. ज्या धर्मालिा गांधीजी स्वतःचा धर्म म्हणाले ते... धर्म आता संघाच्या फॅक्टरीतून अंत्यत जहरी असा धर्मांध क्लोन बनून निघत आहे आणि समाज... विषमता माजवित आहे. संघवाले निरपरांध्यांना मारताना 'जय श्रीराम' म्हणतात, आणि गांधी... मरताना उच्चारलेला 'हे राम' कीती साम्य कीती भेद आहे. महत्वाचे म्हणजे भारतीय मुसलमानां... हे दोन्ही राम नाहीत कारण एहसान जाफरी यांने जीव वाचविण्यासाठी जय श्रीराम हे उद्गार काढ... तरीही तो बेमौत मारला गेला होता. म्हणून गांधीच्या रामात किंवा श्रीरामात कोणताच राम, अ... राहिला नाही.

या देशातील मेंदूना, पाकिस्तानवादयांनी भारताच्या सीमेबाहेर हाकलले आणि हिंदूत्ववादय... उरलेल्या देहाचे एक बुजगावणे करून ठेवले अशा अवस्थेत सामान्य तळागाळातील मुस्लिम सम... कधी मोहरमचा ताजिया तर कधी हाडपोक्या गणपती ठरला. जेव्हा जेव्हा धर्म–जात या... सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव होतो तेव्हा फक्त आणि फक्त हा सामान्य दलितसदृश्य मुस्लिम सम... गर्दी वाढवण्यासाठी आठवून त्यांचा उपयोग केला जातो देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात अनेकांनी सर्व... अर्पण केले पण ज्यांनी इंग्रजांशी एकनिष्ठता पाळली, तेच आज न्यायाधीश बनून अनेक आरोप...

दाखल करून भारतीय मुस्लिमांना अपराधी ठरवत आहेत. आता मात्र पाकिस्तान ते हिंदूराष्ट्र अशी जीवघेणी फरपट संपली पाहिजे कारण,

महाभारत ते कर्बला यांच्यातील मी कुणीही नाही
बाबरी ते राममंदीर यांच्यातील मी कुणीही नाही
संस्कृती रक्षणासाठी मी कुणालाही मारू इच्छित नाही
धर्म रक्षणार्थ मी कुणावरही शस्त्र उगारू इच्छित नाही
मी अल्लाला वाचविण्यासाठी इश्वराला मारू इच्छित नाही.....
'मजहब' ते धर्म अशी माझी तिजारत संपली पाहिजे
'आबेजमजम' ते 'गंगाजल' अशी माझी विक्रि संपली पाहिजे,
'मजलिस' ते 'संत्संग' अशी माझी प्रदर्शनी संपली पाहिजे....
मी कोणताही ऐतिहासिक वारसा घेऊ इच्छित नाही.
माणूस ऐवजी अर्धा हिंदू–अर्धा मुसलमान जगू इच्छित नाही.....
सर्वात आधी मला माझ्या संविधान प्रदत्त देशाचा नागरीक म्हणून जगू द्या।

(पृ. २५–३०)

पाक–हिंदू, महाभारत–कर्बला हे धर्मयुध्द, वसुधैव कुटुंबकम रब्बूआलमिन दारूल हरब–पुण्यभू, बाबरी–राममंदीर, मजहब–धर्म, आबेजमजम–गंगाजल, मजलिस–सत्संग ही सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक राष्ट्रीय दूही, भेदाभेद संपला पाहिजे. भारतीय भेदाभेद संपला पाहिजे. भारतीय संविधानाने स्वतंत्र देशाचा स्वतंत्र नागरीक म्हणून हक्क दिला आहे. या जगण्याच्या हक्काने समाजाला जगू दया. कुठल्याही संस्कृतीचा वा धर्माचा भाग न बनवता फक्त संविधानाचा नागरीक म्हणून जगता आले तरी आनंदाने जीवन व्यक्त करता येईल अशा आशावाद कवी व्यक्त करतात.

पण असे जगणे सहजपणे वाटयाला येणार नाही हे कवीने 'मुसलमानांचे सामुहिक गाणे' या कवितेत आजोबा–नातवाच्या संवादातून चित्रित केले आहे. आजोबा आपल्या इस्लामी राजवटीचा सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, ऐतिहासिक वैशिष्टयांचा संपन्न इतिहास आणि आजची मुस्लिम समाजाचा अवस्था नातवापुढे वर्णन करतो आणि नातू भूतकाळातील स्मृतीशेष इतिहासाच्या नऊशे वर्षाच्या काळातील सोनेरी गॅस भरणे सोडून, सुल्तान अन शाहयासोबत सामान्य जनांची नाळ जोडून आमच्या भारतीय असण्याच्या मुळया ऊखळू नकोस असे सांगून या जगण्याकरीता....

दादाजान, आता ऐक माझं गाणं
''संघर्ष मस्ट गो ऑन संघर्ष मस्ट गो ऑन!''
इस्लाम ने मला धर्म दिला संविधनाने दिला देश
मी अ.ब्राम्हणी प्रवाहातला क्रांतिकारी दरवेश''

(पृ.६५)

परीवर्तनाची, बदलाची अपेक्षा करणारी आजची ही पिढी आता जुनं ते सोनं म्हणून त्याचा आधार जगण्यासाठी घेणार नाही तर क्रांती करण्याच्या प्रयत्नातूनच संपूर्ण देशाची व्यवस्था बदलवण्याचे स्वप्न पाहणारी ही पिढी संघर्षाला सामोरे जाणारीच आहे. संविधानाच्या आधारे स्वत:चे अस्तित्व सिध्द करणे हे वर्तमानकालीन जनतेचे ध्येय आहे. जर संविधानाचा आधार नसता तर

मोक्ष देणाऱ्या भर कावळयांचा आश्रित मी होतोच हो
वाचलो तिथून तर मुल्लांनी सांगितलेल्या 'चेहलम' चा
मोहताज मी होतोच हो
कितीही आवळला पाश तरी माझ्या देशाचा मी
मालक आहेच हो नाही तर 'वारी' असो की 'उरूस'
सजवलेला घोडा होतोच हो! (पृ.३६, ३७)

भारतीय सनातनी परंपरेने धार्मिक मत्तेदारीत अडकवून कित्येक पिढयांचा नाश केला. आता ही तो संपलेला

नाही पण असा कितीही पाश आवळला तरीही सशक्त संविधानाच्या आधारामुळे आपल्या देशाचे, आपल्या आयुष्याचे आपणच मालक असल्याचा स्वाभिमान येतो. याशिवाय 'सैय्यदजी' या कवितेत तत्कालीन राजकारण, नेतृत्व यावर घणाघाती कोरडे ओढले आहेत. मुस्लिम समाजातील उच्चभ्रू म्हणवीणारे सय्यदजी म्हणजे सैय्यद शहाबोद्दीन, सैय्यद शाहनवाज हे नतृत्व स्वः समाजालाच कसे गंडवतात व शोषण करतात याचे अत्यंत पोडतिडकीने चित्रण केले आहे.

'स्व' च्या जागांची विक्री असो की
चार पैशात विकला जाणारा फतवा असो
मदरशांच्या पैशातील भ्रष्टाचार, राजकारणातील सल्ला असो
मस्जिदींचा अल्ला हो अकबर की असो पार्टीतील शिष्टाचार
चोहिकडे सैय्यदच सैय्यद आहे! चोहिकडे सैय्यदच सैय्यद आहे!! (पृ.४०)

मुस्लिम समाजात डॉ.आंबेडकर–पुणे सारखे नेतृत्व नाही जे नवमुस्लिम नेते आहेत ते स्वतःचा स्वार्थ साधणारे असून धर्म आणि संस्कृतीच्या नावावर स्वतःची सत्ता साभाळण्याकरीता सैय्यद नेता बनलेले आहेत. अजूनही भारतीय खलिफा मुसलमानांना मिळाला नाही, सामान्य मुस्लिम समाज त्याची आतूरतेने वाट पाहत आहेत. प्रत्येक पार्टीत असलेले हे सैय्यद 'इस्लाम तामिल करना होगा' असे सांगून धार्मिक कट्टरता निर्माण करत आहेत.

'राजकीय संशोधन', 'आस्थेचा नवा इतिहास', 'कारखाने या कविता तत्कालीन राजकीय व त्याआधारे निर्माण होत असलेले गंभीर सामाजिक वातावरणाच्या सुक्षमातिसुक्ष्म घटना चे वर्णन ज्वलंत शब्दात करते. संस्कृती आता असंस्कृतीकडे चाललीय, तिच्या विकृत संक्रमण होउ लागले. रूढी, परंपरा, जात, धर्म, स्पृश्य–अस्पृश्य, नाती–गोती, लहान–मोठे, उच्च–निच, शोधग्रस्त, कुपोषणग्रस्त, बेरोजगार, आदिवासी, अल्पसंख्याक, बालक–पालक असे अनेक घटकांच्या नावाखाली नैतिकतेचा, व्याभिचार, भ्रष्टाचार होऊ लागला आहे. शासकीय योजना राबवितांना यांचे दाखले देउन, त्याच्या नावावर अनेक योजना येतात पण या योजना हातात असतात.

माफीया, गुंड, दारू–ब्लॅकमेल, भ्रष्टाचारी
बांधकामं कॅम्प, योजना ते कष्ट व्यापारी
भूखंड, श्रीखंड, तेलगी, चारा ते शुगर फॅक्ट्री,
रोजगार हमी, निराधार, कुंएबत ते खिचडी
महामंडळे, शाळा कॉलेजस, मिस्ट्री–विल्ट्री ते पोल्ट्री
कानात फाये टाकून उभे असतात.
जिल्हा परिषद ते संसदेपर्यत दलाल इथे दरबारी! (पृ.४९)

हे सामान्यांच्या सर्वागिन विकासाचे धोरण एखादया वेश्येने शे–दोनशे रूपये न्यावे तसे नेते पाच वर्षासाठी घेऊन जातात म्हणून कवी म्हणतात आलटून पालटून दोघानाही से वर्कर म्हणवून घेण्याची कायदेशीर तरतूद करा! अशा शब्दात पर मत व्यक्त करूनही कवीला प्रश्न पडतो की कसं लिहायचं ? कोणती प्रतीक वापरायची कशाची प्रतिमा द्यायची ? व्यंग करायचे तरी कसे ? विंडबना मांडायची तरी कशी कोणतीही प्रतिमा, प्रतीक वापरली तरी या आदर्श लोकांनी पूरी पडणार आहेत काय ? चीड व्यक्त करायची तरी कशी ? असहायता दर्शवायची तरी कशी ? अशी वेदना ते काव्यसंग्रहाच्या मनोगतात व्यक्त करतात.

'नय उतराई' या कवितेतील राजकारणातील तिकींट प्राप्तीच्या प्रयत्नापासून अनेक कोटीच्या बोलीपर्यंत शासन विकत घेतले जाते.

सरकार स्थापन्यासाठी घोडे बजार वेग घेतोय
अल्पमताने बहूमतात येतोय!!
लोक हो, आता पांढरी मंडी सजेल
विधानसंभा, परिषद, राज्यसभा, मंडळ की....?

ISSN : 2278-9308
December, 2021

असेल दम तर या
'संभोगातून समाधीचा' आनंद घेण्यासाठी .....
कारण लोकांनी लोकांसाठी लोकांकरीता केलेले
हे कल्याणकारी राज्य आहे। (पृ.५८, ५९)

तत्कालीन राजकारणातील बुरयटलेपणा भ्रष्टाचार नैतिक अध:पतन, षडयंत्रपूर्ण अशी कृती, यामुळे हे पुढारी सत्तांध होतात. लोकशाहीची घोषणा होते आहे पण सत्ताधारी लोक हुकुमशहा बनतात आणि हुकुमशाही करतात यालाच लोकांचे कल्याणकारी राज्य म्हणायचे का ?

'पत्रकार महोदय' या कवितेत आजची प्रसारमाध्यमांची वास्तवस्थिती वर्णीत केलेली आहे. कधी काळी वर्तमानपत्र हे लोकबोधनाचे साधन होते, हे समाज परीवर्तनाचे साधन होते आज मात्र नेतच्या निवडणूकीच्या काळात बंद पडलेली ही लेखणी स्वत:चे पोट चालवण्याकरीता पक्षाचे राजकारण करते. कारण तो त्यांचा धंदे का टाईम असतो.

महोदय प्रत्येक पार्टीचे
न्युज पॅकेज फिक्स आतात
टॉप द्यायचे, की 'बॉटम' फ्रंट द्यायचं की 'इन्नर'
सगळेच आयटम मस्त असतात.....
भारतीय लोकशाहीच हीच शोकांतीका आहे,
ज्यांच्या विरोधात लढतो आम्ही
त्यांच्याच हाती एकवटलीली निर्णयाची शक्ती आहे!!
पत्रकार महोदय थॅंक्यू व्हेरी मच!
मन:पूर्वक तुमचा आभारी आहे!! (पृ. ५५, ५६)

पत्रकार व्यवसायातील हा भ्रष्टाचार कवीने स्पष्टपणे आणि परखडपणे व्यक्त केला आहे. पक्षाचे वर्तमान असेल तर प्रस्थापित नेत्यांचे गलेलठ्ठ व्यक्तिमत्व फोटोसह टाकतात सामाजिक कार्यकर्ते मात्र दिसत नाही. प्रत्येक पान खरेदी केल्यासारखे तेवढेच वर्णन करते. भांडवलशाही व्यवस्थेत लोकशाहीचा चवथा आधार असलेल्या या माध्यमाकडे नेत्यांकरीता माहोल बनवण्याचे कार्य येत असते त्यात ते व्यस्त असतात. याचा जाब विचारला तर स्वत:च्या पोटापाण्याची तरतूद म्हणून हे करावेच लागते असे पांगळे उत्तर मिळते. दोन महिन्याच्या निवडणूकीच्या काळात पैशाच्या इतका काळाबाजार होतो की चार वर्षाचा खर्च त्यातून भागत असतो. ही वास्तवस्थीती कवीने इथे संतापाच्या अंगाने चित्रीत केलेली आहे. संवेदणशील मनाच्या कवीला जिथे जिथे, ज्या ज्या घटकांची पायभल्ली होते तिथे तिथे त्याचे मन विद्रोही होते आणि विद्रोहाच्या अंगानेच तो विषय कवीच्या शब्दात आकार घेत असतो म्हणूनच फकरूद्दीन बेन्नूर म्हणतात, व हे गांधी कशातच राम नाही या संग्रहात तो जसा महात्मा गांधीना घेऊन निघाला आहे तसा वाढता भ्रष्टाचार, हिंसाचार आणि विषमता यांना आवाहन देतो आहे.''

अशा विविध कवितांमधून जावेद पाशा यांनी तत्कालीन सर्वागिन घडामोडीवर ताषेरे ओढले आहेत म्हणूनच फ.म.शहाजिंदे प्रस्तावनेत म्हणतात 'हे गांधी कशातच राम नाही' हा संग्रह आस्वादताना आशय आणि अभिव्यक्ती यांच्या अभिन्नतेतून वेदना, विद्रोह आणि नकार यांची घाळ तीव्रतर होत गेल्याचे प्रकर्षाने जाणवत राहते. कारण भारतीय मुसलमान समाजाच्या वर्तमान जगण्यावर चटक्यानंतर चटके बसत असताना बैचेन झालेले मुस्लिम मन चित्कारते आहे.'' अशा चित्कार मुस्लिमांकरीताच नाही तर संपूर्ण शोषित समाजव्यवस्थेकरीता आहे. जागतिकीकरणात भारताची स्थिती काय आहे याचा विचार न करता देशातच इतकी अंधाधुंदी आहे की कसलीही स्पष्ट दिशा दिसत नाही अशी एकदंर स्थिती भारताची झाली आहे.

'पत्रकार महोदय, 'नथ उतराई', 'कबूल करायला काय हरकत आहे', 'एड्स' या कवितांमधून धर्म—राजकारणाच्या ढोंगीपणामुळे भारताच्या घातक विकासाच्या दृष्टीने एकदंरीत भारतीय समाजाची

असेल दम तर या
'संभोगातून समाधीचा' आनंद घेण्यासाठी .....
कारण लोकांनी लोकांसाठी लोकांकरीता केलेले
हे कल्याणकारी राज्य आहे। (पृ.५८, ५९)

तत्कालीन राजकारणातील बुरयटलेपणा भ्रष्टाचार नैतिक अध:पतन, षडयंत्रपूर्ण अशी कृती, यामुळे हे पुढारी सत्तांध होतात. लोकशाहीची घोषणा होते आहे पण सत्ताधारी लोक हुकुमशहा बनतात आणि हुकुमशाही करतात यालाच लोकांचे कल्याणकारी राज्य म्हणायचे का ?

'पत्रकार महोदय' या कवितेत आजची प्रसारमाध्यमांची वास्तवस्थिती वर्णीत केलेली आहे. कधी काळी वर्तमानपत्र हे लोकबोधनाचे साधन होते, हे समाज परीवर्तनाचे साधन होते आज मात्र नेतच्या निवडणूकीच्या काळात बंद पडलेली ही लेखणी स्वत:चे पोट चालवण्याकरीता पक्षाचे राजकारण करते. कारण तो त्यांचा धंदे का टाईम असतो.

महोदय प्रत्येक पार्टीचे
न्युज पॅकेज फिक्स आतात
टॉप द्यायचे, की 'बॉटम' फ्रंट द्यायचं की 'इन्नर'
सगळेच आयटम मस्त असतात.....
भारतीय लोकशाहीच हीच शोकांतीका आहे,
ज्यांच्या विरोधात लढतो आम्ही
त्यांच्याच हाती एकवटलीली निर्णयाची शक्ती आहे!!
पत्रकार महोदय थॅंक्यू व्हेरी मच!
मन:पूर्वक तुमचा आभारी आहे!! (पृ. ५५, ५६)

पत्रकार व्यवसायातील हा भ्रष्टाचार कवीने स्पष्टपणे आणि परखडपणे व्यक्त केला आहे. पक्षाचे वर्तमान असेल तर प्रस्थापित नेत्यांचे गलेलठ्ठ व्यक्तिमत्व फोटोसह टाकतात सामाजिक कार्यकर्ते मात्र दिसत नाही. प्रत्येक पान खरेदी केल्यासारखे तेवढेच वर्णन करते. भांडवलशाही व्यवस्थेत लोकशाहीचा चवथा आधार असलेल्या या माध्यमाकडे नेत्यांकरीता माहोल बनवण्याचे कार्य येत असते त्यात ते व्यस्त असतात. याचा जाब विचारला तर स्वत:च्या पोटापाण्याची तरतूद म्हणून हे करावेच लागते असे पांगळे उत्तर मिळते. दोन महिन्याच्या निवडणूकीच्या काळात पैशाच्या इतका काळाबाजार होतो की चार वर्षाचा खर्च त्यातून भागत असतो. ही वास्तवस्थीती कवीने इथे संतापाच्या अंगाने चित्रीत केलेली आहे. संवेदणशील मनाच्या कवीला जिथे जिथे, ज्या ज्या घटकांची पायभल्ली होते तिथे तिथे त्याचे मन विद्रोही होते आणि विद्रोहाच्या अंगानेच तो विषय कवीच्या शब्दात आकार घेत असतो म्हणूनच फकरूद्दीन बेन्नूर म्हणतात, व हे गांधी कशातच राम नाही या संग्रहात तो जसा महात्मा गांधीना घेऊन निघाला आहे तसा वाढता भ्रष्टाचार, हिंसाचार आणि विषमता यांना आवाहन देतो आहे.''

अशा विविध कवितांमधून जावेद पाशा यांनी तत्कालीन सर्वांगिन घडामोडीवर ताषेरे ओढले आहेत म्हणूनच फ.म.शहाजिंदे प्रस्तावनेत म्हणतात 'हे गांधी कशातच राम नाही' हा संग्रह आस्वादताना आशय आणि अभिव्यक्ती यांच्या अभिन्नतेतून वेदना, विद्रोह आणि नकार यांची घाळ तीव्रतर होत गेल्याचे प्रकर्षाने जाणवत राहते. कारण भारतीय मुसलमान समाजाच्या वर्तमान जगण्यावर चटक्यानंतर चटके बसत असताना बैचेन झालेले मुस्लिम मन चित्कारते आहे.'' अशा चित्कार मुस्लिमांकरीताच नाही तर संपूर्ण शोषित समाजव्यवस्थेकरीता आहे. जागतिकीकरणात भारताची स्थिती काय आहे याचा विचार न करता देशातच इतकी अंधाधुंदी आहे की कसलीही स्पष्ट
भारताची स्थिती भारताची झाली आहे.
दिशा दिसत नाही अशी एकदंर स्थिती 'पत्रकार महोदय, 'नथ उतराई', 'कबूल करायला काय हरकत आहे', 'एड्स' या कवितांमधून

'पत्रकार महोदय, 'नथ उतराई', 'कबूल करायला काय हरकत आहे', 'एड्स' या कवितांमधून भारताच्या घातक विकासाच्या दृष्टीने एकदंरीत भारतीय समाजाची धर्म–राजकारणाच्या ढोंगीपणामुळे

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 333 (CCCXXXIII)
ISSN : 2278-9308
December, 2021

दिशाभूल करण्याची जो अविरत कामगीरी होत आहे त्यामुळे विकासाला आढा बसत आहे. तिला राजकीय धर्म, आदर्श हेंडूक' या कविता पुरूषी अहंकारांचा, काळया कर्तत्वाचा मागोवा घेतात. निवडणूकीच्या काळात राजकारणाचा व्यवसाय करणारे पत्रकार आपल्या लेखणीकडे कमाईचे साधन म्हणून पाहतात.'' आम्ही ही नौकर आहोत आहे आम्हालाही पोठ जरा समजून घ्या साहेब पेपर चालवायलाही लागतात हो नोट'' अशी वेदना व्यक्त करणारा वर्तमानपत्र व्यवसाय समाजात कोणते परीर्वतन करेल हा प्रश्न इथे उपस्थित होतो. 'नथ उतराई' तिचा राजकीय धर्म हया कवितांमध्यू वेश्याव्यवसायाला राजकारणी आवरण घालून देशाच्या राज्यव्यवस्थेचे विंडबनात्मक दर्शविले आहे. 'आस्थेचा नवा इतिहास' या कवितेत बाबर आणि बाबरी मस्जिद पासून राममंदिरावर लिहिलेल्या इतिहासाचे वर्णन व माणूसकीला काळीमा फासणारी आस्था व्यक्त केली आहे.

अशाप्रकारे संपूर्ण काव्यसंग्रहाचा आढावा घेतल्यास तत्कालीन राजकारणाची दयनिय अवस्था टिकास्त्र सोडून स्पष्ट केली आहे म्हणूनच प्रमोद मुनघाटे म्हणतात, ''या देशातील राजकारण, धर्मकारण आणि सांस्कृतिक क्षेत्र जसे भोगवादी सत्तांध झाले आहेत तसेच पत्रकारितेचेही बाजारीकरण झाले आहे. कवी जवळ नैतिक धारिष्टय असल्यामुळे याचे नेमके वर्णन कवीला करता आले म्हणूनच त्यांची कविता वाचणे आणि पचवणे हाही एक सांस्कृतिक शुध्दीकरणाचा भाग आहे.''

संदर्भ :

प्रा.जावेद पाशा कुरैशी: हे गांधी कशातच राम नाही, भूमी प्रकाशन, लातूर २०११.